आपलं महानगर

# पाचोरेवणीत कृषीदूतांकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन



नाशिक । शेतकरी बांधवांनी उत्पादन वाढीसाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करावा व आपल्या उत्पादनामध्ये वृद्धी कशी होईल, याबाबीकडे प्रामुख्याने लक्ष केंद्रित करावे, सोयाबिन बियाणे उगवण क्षमता तपासून घरच्या बियाण्याचाच वापर करावा. याच अनुषंगाने पाचोरी वणी ग्रामपंचायत कार्यालय शेतकरी -पाठशाळा घेऊन मार्गदर्शन विद्यार्थी करत आहे.

के. के. वाघ उद्यान विद्या महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थी ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत पाचोरे वणी येथे शेतकऱ्यांना कृषी अधिकारी आधारित विविध विषयांवर मार्गदर्शन करत आहे. या कार्यक्रमात कृषिदूत दाते हर्षद, देशमुख शुभम, वाखरे शुभम, डेर्ले अभिषेक, शिंदे जयेश. या विद्यार्थ्यांनी चार महिन्यांसाठी गावात राहणार असून शेतकऱ्यांना विविध शेतीविषयक प्रात्यक्षिके देऊन यातून मार्गदर्शन करत आहेत. त्यामध्ये माती परीक्षण, खत व पाणी पिकावर येणारे विविध रोग व कीड यांचे व्यवस्थापन बीज प्रक्रिया इत्यादी विषयांवर चर्चा व मार्गदर्शन करत आहे. कार्यक्रमासाठी सरपंच निता नरेंद्र वाटपाडे, उपसरपंच मीना रसाळ यांचे सहकार्य लाभले.

## 'क्षण आनंदाचे, मौज मस्तीचे' समूहाचा आज स्नेहमेळावा

नाशिक । क्षण आनंदाचे, मौज मस्तीचे या समूहाचा स्नेहमेळावा शनिवारी (दि.२५) सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत हॉटेल पंचवड प्राइड, पंचवटी येथे होणार आहे. या स्नेहमेळाव्यासाठी राज्यभरातून सुमारे १४०० हून अधिक सदस्य येणार आहे. या मेळाव्यात मनोरंजनात्मक विविध खेळ खेळण्यात येणार आहेत. यावेळी लकी पैठणी, होम

## मृत आपत्ती चार लाखां



# के के वाघ उद्यान विद्या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीचे उंबरखेड शेतीविषयक मार्गदर्शन



**आडगाव । प्रतिनिधी**

सध्या परिस्थिती पाहता राज्यात अनेक शेतकरी हे शेतीचे नीट प्रशिक्षण नसल्याने, योग्य सल्ला मिळत नसल्याने भरदार पीक काढण्यास अयशस्वी ठरत आहे. व यातून अनेक आत्महत्या देखील होत आहे. याच अनुषंगाने उंबरखेड ग्रामपंचायत कार्यालय शेतकरी पाठशाळा घेऊन मार्गदर्शन विद्यार्थिनी करत आहे. उंबरखेड के के वाघ उद्यान विद्या महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत उंबरखेड येथे शेतकऱ्यांना कृषी अधिकारी आधारित विविध विषयांवर मार्गदर्शन करत आहे.या कार्यक्रमात विद्यार्थिनी गायत्री सानिका,आकांक्षा घरडे,पल्लवी गोराडे, अंजली गायकवाड ,श्रुती ठोके व शर्मिला पाडवी या विद्यार्थिनी दोन महिन्यांसाठी गावात राहणार असून शेतकऱ्यांना विविध शेतीविषयक प्रात्यक्षिके देऊन यातून मार्गदर्शन करत आहेत. त्यामध्ये माती परीक्षण, खत व पाणी व्यवस्थापन,पिकावर येणारे विविध रोग व कीड यांचे व्यवस्थापन बीज प्रक्रिया इत्यादी विषयांवर चर्चा व मार्गदर्शन करत आहे .

कार्यक्रमासाठी विद्यार्थिनींना उंबरखेड गावाचे सरपंच रमेश निर्गुडी, उपसरपंच मुकुंद घुमरे यांचे सहकार्य लाभले तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक संधान सर व कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक रोहम सर यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्य नगरी
शनिवार, २ जुलै २०२२ | शहर

# पाचोरे वणी गावात कृषी दिन साजरा




**नाशिक** : दरवर्षी 1 जुलैला राज्यात कृषी दिवस साजरा करण्यात येत असून 1 जुलै ते 7 जुलै या आठवड्याभराच्या काळात कृषी सप्ताह साजरा केला जातो. राज्यातील हरित क्रांतीचे जनक आणि माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी कृषी क्षेत्राच्या विकासात दिलेल्या योगदानाच्या स्मरणार्थ आजचा दिवस हा कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. देशाची तसेच राज्याची अर्थव्यवस्था मुख्यतः कृषी क्षेत्रावरच अवलंबून आहे. महाराष्ट्र राज्यही कृषी क्षेत्रात एक अग्रगण्य राज्य समजलं जातं. महाराष्ट्रामध्ये हरित क्रांती आणण्यामध्ये तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईकांचं मोठं योगदान आहे. त्यांना राज्याच्या हरित क्रांतीचे जनक म्हटलं जातं.राज्यातील कृषी क्षेत्राचा विकास कसा होईल, राज्य अन्नधान्याच्या बाबतीत कसं स्वयंपूर्ण होईल यावर वसंतराव नाईकांनी विशेष लक्ष दिलं. याच पार्श्वभूमीवर ग्रामीण उद्यानविद्या कायार्नुभव कार्यक्रमा अंतर्गत पाचोरी वणी गावात कृषीदूतांनी कृषी दिन साजरा केला. क का वाघ उद्यान विद्या महाविद्यालयाच्या अंतिम वषार्चे कृषिदूत दाते हर्षद, देशमुख शुभम, डेर्ले अभिषेक , वाखरे शुभम,, शिंदे जयेश. कार्यक्रमाचाच भाग म्हणून पाचोरे वणी ग्रामपंचायत परिसरात वृक्षारोपण करण्यात आले तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची वृक्षदिंडी काढण्यात आली.

कार्यक्रमासाठी गावाचे सरपंच नीता नरेंद्र वाटपाडे , उपसरपंच मीना ज्ञानेश्वर रसाळ यांचे सहकार्य लाभले. प्राचार्य मंदाकिनी घेगडमल ,उपप्राचार्य अनुसया पाटील व शिक्षण, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते .तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक संधान सर व कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक रोहम सर यांचे मार्गदर्शन लाभले.